**<u>ठळक बातम्या</u>**

- दावोसमध्ये यंदा महाराष्ट्राचे ३० लाख कोटी रुपयांच्या गुंतवणुकीचे करार, आणखी १० लाख कोटी रुपयांपर्यंतची गुंतवणूक होण्याची शक्यता

- जम्मू-काश्मिरमध्ये डोडा जिल्ह्यात लष्कराच्या वाहनाला झालेल्या अपघातात १० जवानांचा मृत्यू, १० जण गंभीर जखमी

- झारखंडमध्ये चकमकीत १५ नक्षलवादी ठार

- यंदाच्या प्रजासत्ताक दिन संचलनात गणेशोत्सवावर आधारित महाराष्ट्राचा चित्ररथ

**आणि**

- चांदीच्या दरात किलोमागे १९ हजार रुपयांची घसरण, शेअर बाजारात तेजी

**<><><><><><>**

जागतिक आर्थिक परिषदेच्या दावोसमध्ये झालेल्या बैठकीतून यंदा राज्यात ३० लाख कोटी रुपयांची गुंतवणूक आली आहे. आणखी ७ ते १० लाख कोटी रुपयांची गुंतवणूक प्रस्तावित असल्याची माहिती मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिली. दूरस्थ पद्धतीने झालेल्या वार्ताहर परिषदेत ते आज बोलत होते. या गुंतवणूकीपैकी ८३ टक्के करार थेट परकीय गुंतवणुकीचे आहेत. १६ टक्के गुंतवणूक ही परकीय कंपन्यांची आहे, अशी माहितीही त्यांनी दिली. यात उद्योग, सेवा, कृषि, तंत्रज्ञान या सर्व क्षेत्रांचा समावेश आहे. देशात ज्या घटकांची आयात होते, त्यासाठी पर्यायी घटकांच्या निर्मितीच्या उद्देशाने ही गुंतवणूक होत आहे, असं मुख्यमंत्री म्हणाले. गेल्यावर्षी झालेल्या गुंतवणूक करारांपैकी ७५ टक्के करार प्रत्यक्षात येत असल्याचं त्यांनी सांगितलं.

नवी मुंबई विमानतळाच्या जवळ टाटा समुहाच्या मदतीनं नवोन्मेष शहर उभारलं जाणार आहे. तसंच, मुंबईतल्या बीकेसीच्या धर्तीवर रायगड-पेण ग्रोथ सेंटर सुरू करण्यात येणार असल्याचं मुख्यमंत्री म्हणाले..

**होल्ड.. बाईट - मुख्यमंत्री**

कोकणात साडे तीन लाख कोटी रुपयांची गुंतवणूक, उर्वरित विदर्भ आणि नागपूर विभागात २ लाख ७० हजार कोटी तर छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यात ५५ हजार कोटींची गुंतवणूक होणार असल्याची माहिती मुख्यमंत्र्यांनी दिली. नाशिक, जळगाव, अहिल्यानगर, नंदुरबार आणि धुळे जिल्ह्यात ५० हजार कोटींची गुंतवणूक होणार असल्याचं ते म्हणाले.

**<><><><><><>**

राज्यातल्या २९ महानगरपालिकांमधल्या महापौर पदाची आरक्षणाची सोडत आज मंत्रालयात काढण्यात आली. पुढच्या अडीच वर्षांसाठी ही सोडत निघाली असून, २९ पैकी १५ महापालिकांचं महापौरपद विविध प्रवर्गातल्या महिलांसाठी राखीव झालं आहे. याविषयी अधिक जाणून घेऊया आमच्या प्रतिनिधीकडून…

**होल्ड व्हाइस कास्ट**

*(राज्यातल्या १७ महानगरपालिकांमधे महापौरपद अनारक्षित राहील. या १७ पैकी मुंबई, नवी मुंबई, पुणे, नागपूर, नाशिक, मीरा भाईंदर, मालेगाव, नांदेड-वाघाळा आणि धुळे या ९ ठिकाणी महापौरपद खुल्या प्रवर्गातल्या महिला उमेदवारांसाठी असेल. तर छत्रपती संभाजीनगर, पिंपरी चिंचवड, सांगली-मिरज-कुपवाड, परभणी, अमरावती, सोलापूर, वसई-विरार आणि भिवंडी निजामपूर खुल्या प्रवर्गासाठी आहे.*

*पनवेल, इचलकरंजी, कोल्हापूर आणि उल्हासनगर महानगरपालिकातलं महापौर पद नागरिकांच्या मागास प्रवर्गासाठी तर जळगाव, चंद्रपूर, अहिल्यानगर आणि अकोल्यातलं महापौर पद नागरिकांच्या मागास प्रवर्गातल्या महिला उमेदवारासाठी राखीव झालं आहे.*

*ठाण्याची जागा अनुसूचित जातींसाठी राखीव असून जालना आणि लातूरमध्ये अनुसूचित जातीतल्या महिला नगरसेविकेला महापौर पदाची संधी मिळेल. कल्याण-डोंबिवली महापालिकेतलं महापौर पद अनुसूचित जमातीसाठी आरक्षित झालं आहे.*

*विरोधकांनी आरक्षणाच्या या प्रक्रीयेवर टीका केली आहे. ही प्रक्रीया अपारदर्शकपणे राबविल्याचा दावा काँग्रेस विधीमंडळ पक्षाचे नेते विजय वडेट्टीवार यांनी केला. आरक्षण सोडत काढण्याचे नियम कुणालाही न सांगता बदलण्यात आले होते. सोडतीपूर्वीच आरक्षण निश्चित केलेलं होतं, असा आरोप मुंबईच्या माजी महापौर किशोरी पेडणेकर यांनी केला. मुंबईतले गेले २ महापौर सर्वसाधारण प्रवर्गातून होते त्यामुळं यंदा ओबीसी किंवा अनुसूचित जमाती प्रवर्गातल्या सदस्याला संधी मिळायला हवी होती, असं त्या म्हणाल्या. सरकारनं हे सर्व आरोप फेटाळून लावले आहेत. नियमानुसार सर्व प्रक्रीया पार पाडल्याचं स्पष्टीकरण नगरविकास राज्यमंत्री माधुरी मिसाळ यांनी दिलं आहे. )*

**<><><><><><>**

जम्मू काश्मीर इथल्या डोडा जिल्ह्यात आज लष्कराचं एक वाहन दरीत कोसळून झालेल्या अपघातात १० सैनिकांचा मृत्यू झाला असून दहा जण गंभीर जखमी आहेत. लष्कराचं एक वाहन भाडेवाह ते चंबा मार्गावर असताना हा अपघात झाला. जखमी जवानांना उधमपूर इथल्या लष्कराच्या रुग्णालयात दाखल करण्यात आलं आहे.  राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू, उपराष्ट्रपती सी. पी. राधाकृष्णन, प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्यासह विविध मान्यवरांनी या अपघाताबद्दल तीव्र दुःख व्यक्त केलं आहे.

**<><><><><><>**

झारखंडच्या सिंघभूम जिल्ह्याच्या सारांदा इथल्या जंगलात आज सकाळी झालेल्या चकमकीत १५ नक्षलवाद्यांना ठार करण्यात आलं. मारलेल्या नक्षलवाद्यांमध्ये त्यांचा प्रमुख नेता पातिराम मंझी उर्फ अनल दा यांचा समावेश असून त्याच्यावर एक कोटी रुपयांचं बक्षिस लावण्यात आलं होतं. प्रत्येकी दोन

लाख रुपयांचं बक्षिस असलेल्या राजेश मुंडा आणि बुलबुल यांनाही ठार करण्यात आल्याची माहिती पोलीस महासंचलकांनी दिली.

<><><><><><>

छत्तीसगडच्या बालोबाजार भाटाराप्पा जिल्ह्यातल्या एका स्टिल प्रकल्पात झालेल्या स्फोटामुळे ६ मजूर ठार झाले आणि ५ जण जखमी झाले. इथल्या भाकूलाही गावातल्या रियल इस्पात आणि पॉवर लिमिटेडमध्ये हा स्फोट झाला. उष्ण राख साठवून ठेवणाऱ्या संयंत्रात हा स्फोट झाला.

<><><><><><>

मनरेगा योजनेतल्या त्रुटी दूर करण्यासाठी व्हीबी जी राम जी योजना आणली असल्याचं केंद्रीय ग्रामीण विकास मंत्री शिवराज सिंग चौहान यांनी आज सांगितलं. ते बंगळुरु इथं बातमीदारांशी बोलत होते.

<><><><><><>

कर्नाटकचे राज्यपाल थावरचंद गेहलोत यांनी आज कर्नाटक विधीमंडळाच्या अधिवेशनात अभिभाषण केवळ तीन वाक्यात गुंडाळलं. राज्य सरकारनं दिलेल्या भाषणातल्या पहिल्या दोन आणि शेवटची एक ओळ त्यांनी वाचून भाषण आटोपतं घेतलं. कर्नाटकचे मुख्यमंत्री सिद्धरामय्या यांनी राज्यपालांच्या या वर्तनावर टीका केली आहे.

<><><><><><>

यंदाच्या प्रजासत्ताक दिन संचलनात संरक्षण दलांचं नेतृत्व भारतीय हवाई दल करणार आहे. स्क्वाड्रन लीडर हेमंत सिंग कनियार मानवंदना सोहळ्याचं नेतृत्व करतील. कवायत तुकडीत चार अधिकाऱ्यांसह १४४ जवानांचा समावेश असेल. ऑपरेशन सिंदूरच्या यशानिमित्त यंदाच्या प्रजासत्ताक दिन संचलनात हवाई दलाची २९ लढाऊ विमानं विशिष्ट रचनेनं  सिंदूर हे नाव आकाशात तयार करणार आहेत.

हवाई दलाच्या बँडमध्ये ७५ अग्नीवीर सहभागी होणार असून पहिल्यांदाच ९ महिला अग्नीवीरही आपली कला सादर करतील, अशी माहिती एअर कमोडोर इम्रान झैनी यांनी दिली.

**<><><><><>**

यंदा प्रजासत्ताक दिनी गणेशोत्सवावर आधारित राज्याचा चित्ररथ कर्तव्यपथावरच्या संचलनात सहभागी होणार आहे. ‘आत्मनिर्भरतेचे प्रतीक - गणेशोत्सव’ अशी या चित्ररथाची संकल्पना आहे. ढोल वाजवणारी महिला, गणपती साकारणारा मुर्तीकार, विसर्जनासाठी निघालेले गणेशभक्त आणि अष्टविनायक मंदिराची प्रतिकृती या चित्ररथात आहे. यंदा एकूण १७ राज्य आणि १३ मंत्रालयांचे एकूण ३० चित्ररथ या संचलनात सहभागी होणार आहेत.

**<><><><><>**

प्रशासनाशी झालेल्या चर्चेनंतर पालघरमध्ये जिल्हाधिकारी कार्यालयासमोर केलेलं आंदोलन कष्टकऱ्यांनी मागे घेतलं आहे. वनहक्क कायद्याचे प्रलंबित दावे ३० एप्रिलपर्यंत निकाली काढू असं आश्वासन जिल्हाधिकारी इंदु राणी जाखड यांनी दिल्याचं माकपानं प्रसिद्धीपत्रकात म्हटलं आहे.आंदोलनाच्या आधी झालेल्या मोर्चात ५० हजारांहून अधिक शेतकरी आणि आदिवासी सहभागी झाले होते.

**<><><><><>**

मुंबईच्या सराफा बाजारात आज चांदीच्या दरातत किलोमागे १९ हजार ३८६ रुपयांची घसरण झाली. त्यामुळं एक किलो चांदीसाठी ३ लाख ८ हजार ७०२ रुपये मोजावे लागत होते. सोन्याचा दरही ३ हजारांहून अधिक रुपयांनी घसरला. त्यामुळे एक तोळा २४ कॅरेट सोन्यासाठी सुमारे १ लाख ५५ हजार रुपये, तर २२ कॅरेट सोन्यासाठी सुमारे १ लाख ५२ हजार रुपये मोजावे लागत होते.

ग्रीनलँडच्या मुद्द्यावर अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी सौम्य भूमिका घेतल्यामुळं जगभरातल्या शेअर बाजरांसह देशातले शेअर बाजारही आज वधारले.

दिवसअखेर सेन्सेक्स ३९८ अंकांनी वधारुन ८२ हजार ३०७ अंकांवर बंद झाला. निफ्टी १३२ अंकांची वाढ नोंदवून २५ हजार २९० अंकांवर स्थिरावला.

<><><><><><>

टी ट्वेंटी क्रिकेट विश्वचषक स्पर्धेसाठी बांगलादेशच्या संघाने भारतात खेळायला पुन्हा नकार दिला आहे. बांगला देशच्या क्रिकेटपटूंच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने त्यांचे सामने भारताबाहेर ठेवावे अशी मागणी बांगला देशाने आंतरराष्ट्रीय क्रिकेट संघटनेकडे केली होती. त्यावर बांगलादेशी खेळाडू, क्रिकेट रसिक किंवा पदाधिकाऱ्यांना भारतात कोणताही धोका नसल्यानं  जागा बदलणार नाही, पुढचा निर्णय बांगलादेशाने गुरुवारपर्यंत घ्यावा असं आयसीसीने काल सांगितलं होतं.

//<><><><><><>//